५ जानेवारी २०२० - पुढारी

# साताऱ्यातील शाळांची प्लास्टिक मुक्तीला सुरुवात

## कर्तव्य सोशल ग्रुपचा विधायक उपक्रम : विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**सातारा : प्रतिनिधी**

शालेय मुलांना प्लास्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम कळावेत आणि लहान वयातच त्यांना प्लास्टिक कचरा निर्मूलनाचा छंद जडावा, यासाठी कर्तव्य सोशल ग्रुप आणि सागर मित्र अभियान या सेवाभावी संस्थेच्या विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या अभिनव आणि कौतुकास्पद उपक्रमाला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी गोळा केलेला प्लास्टिक कचरा दर महिन्याच्या २ तारखेला उचलून त्याचे विघटन करण्यात येत आहे. गुरुवार दि. २ रोजी तब्बल ७५ किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला असून त्याचे विघटन करण्यात आले. दरम्यान, या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी प्लास्टिक कचरा निर्मूलनाची शपथ घेत उपक्रमाला प्रतिसाद दिला.




**विद्यार्थ्यांच्या सहभागातून गोळा केलेल्या कचऱ्याचे कर्तव्य सोशल ग्रुपच्या माध्यमातून विघटन करण्यात आले. त्यावेळी सौ. वेदांतिकाराजे भोसले व इतर.**

कर्तव्य सोशल ग्रुप आणि सागर मित्र अभियान या सेवाभावी संस्थेमार्फत शहर परिसरातील शाळांना प्लास्टिक मुक्तीसाठी आवाहन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या नियोजनासाठी कर्तव्य सोशल ग्रुपच्या संस्थापिका सौ. वेदांतिकाराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. या बैठकीला लोकमंगल हायस्कूल नागेवाडी, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय सातारा, अजिंक्यतारा माध्यमिक विद्यामंदिर शेंद्रे, भारत विद्यामंदिर संभाजीनगर, शाहुपूरी माध्यमिक विद्यालय, ज्ञानवर्धिनी हायस्कूलशाहुपूरी, इक्राइंग्लिशमिडियम स्कूल सातारा, नवीन मराठी शाळा, सौ. सुशिलादेवी साळुंखे हायस्कूल सातारा, सातारा इंग्लिश मिडियम स्कूल, अनंत इंग्लिश स्कूल, हिंदवी पब्लीक स्कूल, दातार इंग्लिश मिडियम स्कूल, डॉ. जे.आर. डब्ल्यू आयरन ॲकॅडमी, अण्णासाहेब राजेभोसले प्राथमिक शाळा, छ. शाहू अकॅडमी आदी शाळेचे प्रतिनिधी उपस्थित होते. शाळांतील विद्यार्थी स्वयंस्फुर्तीने शाळा व विद्यालयाच्या परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करुन ठेवतील आणि हा कचरा दर महिन्याच्या २ तारखेला कर्तव्य सोशल ग्रुपमार्फत वाहनातून उचलून नेवून त्याचे विघटन केले जाईल, असा निर्णय घेण्यात आला होता.

शाहुपूरी माध्यमिक विद्यालय, अण्णासाहेब राजेभोसले प्राथमिक विद्यालय, सुशिलादेवी साळुंखे हायस्कूल, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय लोकमंगल हायस्कूल नागेवाडी, ब्लॉसम स्कूल आदी शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेत दूध पिशवी, तेल पिशवी, पाण्याची बाटली, प्लास्टिक पाऊच, किराणा मालासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक, चॉकलेट रॅपर, तुटक्या वॉटर बॅग, प्लास्टिक चप्पल, प्लास्टिक डबे, कंपास, फोल्डर, फूटपट्टी यासह प्लास्टिकपासून बनवलेल्या तुटक्या, निरुपयोगी वस्तू असा सर्व प्रकारचा सुमारे ७५ किलो कचरा गोळा केला होता. शाळांमध्ये गोळा झालेला कचरा गुरुवारी कर्तव्य सोशल ग्रुपमार्फत वाहनात भरुन विघटनासाठी नेण्यात आला. यावेळी प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी कचरा निर्मूलन आणि प्लास्टिक मुक्तीची शपथ घेवून माझे घर, माझी शाळा कचरामुक्त करण्याचा निधार केला.

या अभिनव उपक्रमात शहरातील सर्व शाळांनी सहभागी व्हावे आणि आपल्या शाळेचा परिसर आणि पर्यायाने आपले सातारा शहर स्वच्छ आणि सुंदर बनवण्याठी योगदान द्यावे. तसेच सुशिक्षित नागरिकांनीही प्लास्टिक कचरा इतरत्र न टाकता विद्यार्थ्यांकडे द्यावा अथवा कर्तव्य सोशल ग्रुपशी संपर्क साधून प्लास्टिक कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावावी, असे आवाहन कर्तव्य सोशल ग्रुपच्या संस्थापिका सौ. वेदांतिकाराजे भोसले यांनी केले आहे. या नाविण्यपूर्ण उपक्रमात सहभागी होण्यासाठी सोहम कुलकर्णी, सुहास वहाळकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.